क्रमांक पोमस/विशा[१०]/पदक / ५३ [२०१०]/ २०१४ मुंबई, दि. /०९/२०१४

**संदर्भ :-** १] परिपत्रक क्र डीजीपी/अेडीजी/एसआरपीएफ/मेडल प्रेसीडेंस/२३३६/२००७, दिनांक १२/८/२००७

२] परिपत्रक क्र. पोमसं/विशा[१०]/पदक/५३/२०१०, दि. २३/८/२०१०

**विषय :-** पदक धारकांनी गणवेशावर क्रमवारीनुसार पदक धारण करणेबाबत.

*****

**परिपत्रक :-**

पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शसनाकडुन तसेच राज्य शासनाकडून विविध पदके जाहीर होतात. सदरची पदके पदक धारकांनी गणवेशावर कोणत्या क्रमाने धार करावीत या बाबत राष्ट्रपतींचे सचिवालय कार्यालयातून क्र. ९०६/प्रेस/२००४, दिनांक १९/७/२००४ च्या अधिसुचनेनुसार सुचित केले आहे. त्यानुसार या कार्यालयाच्या क्र. डीजीपी/अेडीजी/एसआरपीएफ/मेडल प्रेसीडेंटस/२३३७//२००७, दिनांक १२/८/२००७ च्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना सुचना निर्गमीत करण्यात अल्या आहेत. त्याचप्रमाणे या कार्यायाच्या क्र. पोमसं/विशा[१०]/पदक/५३/२०१०, दिनांक २३/८/२०१० च्या परिपत्रकान्वये पुन्हा सुचित करण्यात आले होते. तथापि पोलीस अधिकारी कर्मचारी अधिसुचनेतील क्रमांकानुसार त्यांना प्राप्त झालेली पदके धारण करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ज्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पदके जाहीर झाली आहेत त्यांनी सर्व पदके केंद्र शासनाच्या अधिसुचनेप्रमाणेच गणवेशावर धारण करणे आवश्यक आहे. केद्र शासनाकडून जाहीर होणा-या पदकांपैकी पोलीस विभागाशी संबंधीत पदके खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | अधिसुचनेतील अनुक्रमांक | पदकाचे नांव |
|---|---|---|
| १. | ३ | अशोक चक्र |
| २. | ९ | किर्ती चक्र |
| ३. | ११ | सर्वोत्तम जीवन रक्षा पदक |
| ४. | १७ | राष्ट्रपती पोलीस शौर्यपदक |
| ५. | २४ | पोलीस शौर्य पदक |
| ६. | २८ | उत्तम जीवन रक्षा पदक |
| ७. | २९ | पराक्रम पदक |
| ८. | ४३ | पोलीस [आंतरिक सुरक्षा सेवा] पदक |
| ९. | ४४ | पोलीस [स्पेशिअल डयुटी] मेडल -१९६२ |
| १०. | ४५ | विदेश सेवा मेडल |
| ११. | ४७ | उल्लेखनिय सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक |
| १२. | ५३ | गुणवत्तापुर्ण सेवेसाठी पोलीस पदक |
| १३. | ५७ | जीवन रक्षा पदक |
| १४. | ६२ | स्वातंत्र्याला ५० वर्षे पुर्ण झाल्याबद्दलचे मेडल |
| १५. | ६७ | युएन आणि कॉमनवेल्थ ॲवार्ड |
| १६. | ६८ | इतर पदके व |
| | | **राज्य शासनाकडून प्रदान पदके** |
| | ६८ अ | विशेष सेवा पदक [नक्षल विभाग] |
| | ६८ ब | फोर्स वन मेडल |

२/-

D:\DESK X\Gerenal Circular.doc

२. अधिसुचनेनुसार ६८ क्रमांकावर Other Awards [इतर पदके] असून त्यामध्ये राज्य शासनाकडील सध्या प्रचलित खालील पदकांचा समावेश करून त्याचा क्रम खालील प्रमाणे राहील.

६८ अ - विशेष सेवा पदक [ नक्षल विभाग]
६८ ब - फोर्स वन विशेष पदक

३. पोलीस विभागाशी संबंधीत नमूद पदकाशिवाय केंद्र शासनाकडील अधिसुचनेनुसार जाहीर झालेली पदके [असल्यास] ती अधिसुचनेतील क्रमांकानुसारच लावण्यात यावीत.

४. गणवेशावर पदके धारण करावयाचा क्रम हा सध्या प्रचलित अधिसुचनेप्रमाणे आहे. ज्या-ज्यावेळी सदर क्रमवारीमध्ये केंद्र शासनाकडून बदल करण्यात येईल त्यावेळी त्याप्रमाणे पदके धारण करणे आवश्यक राहील. केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार वेळोवेळी त्याप्रमाणे सर्व घटकांना कळविण्यात येईल

५. पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह हे गणवेशावर शर्टाच्या उजव्या खिशावरील नावाच्या पाटीच्यावर लावण्यात यावे.

तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांनी आपल्या अधिपत्याखालील विविध पदक धारक पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना सदर परिपत्रकानुसार गणवेशावर क्रमवार पदक धारण करण्याबाबत योग्य त्या सुचना द्याव्यात व त्याची काटेकोर अंमलबजावणी होईल याची खात्री करावी.

[ अतुलचंद्र कुलकर्णी ]
विशेष पोलीस महानिरीक्षक [ आस्थापना ]
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य पुणे
आयुक्त व अपर पोलीस महासंचालक, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य मुंबई
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, म.रा.मुंबई/लोहमार्ग,म.रा.मुंबई/
प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई/ वाहतुक,म.रा.मुंबई/
रा.रा.पो.बल, म.रा.मुंबई/न.वि.अ. नागपूर संचालक, पोलीस
बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक [ परिक्षेत्रीय / महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, म.राज्य मुंबई / मोटार परिवहन पुणे/रा.रा.पो.बल पुणे/ नागपूर सह ]
विशेष पोलीस महानिरीक्षक, वि.सु.प्र.शा.वडाची वाडी पुणे/सह आयुक्त, रा.गु.वि.,नागपूर/ फोर्स वन , मुंबई
सर्व पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक [ जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश ]
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट १ ते १५
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये
प्राचार्य, गु.अ.प्र.वि. नाशिक
प्राचार्य, अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर
प्रत सस्नेह अग्रेषित :-
महासंचालक, अे.सी.बी. महाराष्ट्र राज्य, मुंबई, वरीलप्रमाणे कार्यवाहीकरीता

D:\DESK X\Gerenal Circular.doc